शनिपेठ पोलीस स्टेशन

प्रेस नोट

दिनांक- 13/07/2026

प्रती,

सर्व संपादक
दैनिक,साप्ताहिक
मासिक वृत्तपत्र जळगांव

विषय- शनिपेठ पोलीसांची धडक कारवाई शनिपेठ पोलीसांनी थांबविले दोन बालविवाह भविष्यात बालविवाह केल्यास थेट जेलचा कडक इशारा..

दिनांक-22/06/2026 व 10/07/2026 रोजी जळगांव शहरातील जमुना नगर भागात होणार एक बालविवाह तसेच कांचन नगर जळगांव भागातील बिंदुबाई हॉल येथे होणारा एक बालविवाह शनिपेठ पोलीस स्टेशनच्या सतर्कतेमुळे यशस्वीपणे यशस्वीपणे रोखण्यात आला आहे. या धडक कारवाईनंतर पोलीसांनी जमुना नगर भागात व कांचन नगर भागात आणि शनिपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दित बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथेला समुळ नष्ट करण्यासाठी कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला असुन पोलीस स्टेशनच्या हद्दित विशेष मोहिम राबवुन कोठेहि बालविवाह झाल्यास कायदेशीर कडक इशारा दिला आहे.कोणीही बालविवाह करण्याचा प्रयत्त केल्यास कोणतीही पुर्व सुचना किंवा समुपदेशन न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल केले केली जातील.विवाह करणे साठी मुलीचे वय 18 वर्ष व मुलाचे वय 21 वर्ष असणे बंधनकारक आहे असे नसल्यास संबधितावर बालविवाह प्रतिबंधक कायदा 2006 अंतर्गत अजामिनपात्र गुन्हा दाखल केला जाईल.यामध्ये केवळ माता-पिताच नव्हे तर विवाहाला मुकसंमती देणारे नातेवाईक विवाह लावणारे पुरोहित,काझी,मंडप डेकोरेटर्स,बँडवाले वाजंत्री आणि फोटोग्राफर या सर्वांना सहआरोपी करून थेट जेलमध्ये पाठवले जाईल.हा गुन्हा सिध्द झाल्यास दोषींना 2 वर्षापर्यंत सक्तमजुरी आणि 1 लाख रूपये दंड अशी कठोर शिक्षा होईल तसेच संबंधित व्यावसायिकांचे व्यवसाय परवाने कायमचे रद्द केले जातील.

हा केवळ संदेश नसुन भविष्याकालीन कडक कायदेशीर चेतावणी आहे.आमचे पथक अशा गुन्ह्यांवर 24 तास लक्ष ठेवुन आहे.कायद्याचे उल्लंघन करणा-यांची गय केली जाणार नाही.

सदरची कार्यवाही मा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे सो , मा अपरपोलीस अधिक्षक संदिप गावीत सो , उपविभागीय पोलीस अधिकारी नितिन गणापुर सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक विशाल जयस्वाल तसेच मपोउनि/प्रिया दातीर ,परिपोउनि/संतोष खेडकर,परिपोउनि/अभिषेक कटारे,पोहेकॉ/श्रीराम बोरसे ,पोहेकॉ/योगेश जाधव,पोहेकॉ/विजय खैरे,पोहेकॉ/अजय निकम,पोहेकॉ/अनिल साळुखे,पोकॉ/अमोल वंजारी , पोकॉ/पराग दुसाने ,पोकॉ/निलेश घुगे,पोकॉ/नवजित चौधरी,पोकॉ/संभाजी पाटील,पोकॉ/गणेश ढाकणे अशांनी केले.

शनिपेठ पोलीस स्टेशन
जळगांव

पोलीस निरीक्षक
शनीपेठ पो.स्टे.जळगांव